Literacy for a Billion

Movie: Mala Ek Chanas Hava
Year: 2012

Song: Jiv Majha Tujhyasathi Zurtoy
Lyricist: Dr. Shrikant Narule

अशी पाहू नको येड लावू नको
हे अशी पाहू नको येड लावू नको
तुझ्या नजरेचा इशारा कळतोय गं
जीव माझा तुझ्यासाठी झुरतोय गं
जीव माझा तुझ्यासाठी झुरतोय गं
काय बघतोस वरून बघ काळजात शिरून
काय बघतोस वरून बघ काळजात शिरून
कसा फुलात भुंगा दडतोय रं
जीव माझा तुझ्यासाठी झुरतोय रं
जीव माझा तुझ्यासाठी झुरतोय रं

तुझा मर्दानी बांधा
कसा मनात भरलाय रं
तुला बघून डोळ्याचा
आयना तिरपा धरलाय रं
असा छेडू नको जवळ ओढू नको
असा छेडू नको जवळ ओढू नको
असा छेडू नको जवळ ओढू नको
माझ्या उरात धकधक होतय रं
जीव माझा तुझ्यासाठी झुरतोय रं
जीव माझा तुझ्यासाठी झुरतोय रं

टंच नेसलीस नऊवारी
नथ खुलतीया नाकात
पदर धरून दातात
उगा हासतीस गालात
लवतीया कंबर झुलतेया झुंबर
लवतीया कंबर झुलतेया झुंबर
फणा काढून नागोबा डुलतोय गं
जीव माझा तुझ्यासाठी झुरतोय गं
जीव माझा तुझ्यासाठी झुरतोय गं

पेरू आलाय पाडाला नको झोंबूस झाडाला
कुणी बघतील येडया रं जाऊनी लपूया आडला
हो मान वळवू नको मला जळवू नको
मान वळवू नको मला जळवू नको
मान वळवू नको मला जळवू नको
टोच मारायला राघू टपलाय गं
जीव माझा तुझ्यासाठी झुरतोय गं
जीव माझा तुझ्यासाठी झुरतोय रं

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*